# तुमच्या कवितांसाठी धन्यवाद

२७ डिसेंबर, २०२२

आत्मीय वाचक,

*अगदी नजिक आलेल्या*-नववर्ष पूर्वसंध्येच्या तुम्हाला शुभेच्छा!

या वर्षाचा शेवट अगदी जवळ येऊन ठेपला आहे, यावर तुमचा विश्वास बसतो आहे का? दरवर्षी, जेव्हा उत्सवांच्या मोसमाचा उत्साह आपल्याला व्यापून टाकतो, तेव्हादेखील मी स्वतःला हा प्रश्न विचारते. आणि दरवर्षी, मी जेव्हा मागे वळून पाहते, तेव्हा मला असे वाटते की, सिद्धयोग मार्गावर जे काही उन्मीलित होत आले आहे, त्याचे योग्य वर्णन करण्यास माझ्याकडे शब्दच नसतात, मी फक्त एवढेच म्हणू शकते, *काय अद्‌भुत होते हे वर्ष!*

हीच गोष्ट वर्ष २०२२साठीदेखील सत्य आहे. विशेषतः, या वर्षाचे समापन तर असे वाटते आहे की, हे जणूकाही प्रकाशासमवेत नृत्य करते आहे—या महिन्यातील मागील पत्राच्या उत्तरादाखल तुम्ही ज्या कविता लिहिल्या त्यांमुळे हा प्रकाश एका इंद्रधनुष्याच्या सप्तरंगी छटेसह झगमगतो आहे. त्या पत्राद्वारे मी तुम्हाला आमंत्रित केले होते की, तुम्ही वर्ष २०२२साठीच्या श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्‌विषयी तुमचे अनुभव व्यक्त करावेत. त्या वेळी तुमच्याकडे एक सुसंधीदेखील होती, ती म्हणजे, श्रीगुरुमाईंची सुंदर कविता, “माझ्या श्रीगुरूंना एक प्रार्थना” ही वाचण्याची संधी, जिची रचना श्रीगुरुमाईंनी सीझन्स् ग्रीटिंग्स्‌चा त्यांचा स्वतःचा एक अनुभव अभिव्यक्त करण्यासाठी केली आहे.

कवितेशी असलेल्या माझ्या संबंधाविषयी मी तुम्हाला काही सांगू इच्छिते, ज्यामुळे तुम्हाला हे समजून घेण्यास मदत होईल की, मला तुमच्या कविता इतक्या अर्थपूर्ण का वाटल्या. मी आयुष्यभर कविता वाचत आले आहे आणि गेली दहा वर्षे तर मी माझा बराचसा वेळ कविता लिहिण्यात व्यतीत केला आहे; विशेषतः तेव्हापासून, जेव्हापासून मला असे वाटू लागले की, मी गद्यरूपात लिहून स्वतःचे विचार व्यक्त करण्यात सराईत जरी असले, तरीही श्रीगुरुमाईंच्या शिकवणींशी निगडित असलेले माझे अनुभव आणि साधनेतील माझ्या अंतर्दृष्टी या गद्यरूपात अचूकपणे मी व्यक्त करू शकत नाही. अतः काव्यरचना ही माझ्यासाठी शोध घेण्याचा एक मंच व क्रीडांगण बनली. ती माझ्यासाठी एक प्रकारचे घरकुल बनली जिथे मी, मी जशी आहे तशी बनून राहू शकते आणि शोध घेऊ शकते की, ही ‘मी’ आहे तरी कोण.

कधीकधी मी जेव्हा इतर कवींच्या रचना वाचते, तेव्हा त्या मला याच स्थानी परत आणतात ज्याला मी घरकुल म्हणते आहे. तेव्हा कल्पना करा की, हे पाहून मला किती आनंद झाला असेल, जेव्हा मी ‘श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्’वर लिहिलेल्या तुमच्या कविता वाचत होते, तेव्हा त्या मला वारंवार याच स्थानी परत आणत होत्या.

मी असे ऐकले आहे की, एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या वेबसाइट विभागामध्ये सर्व वयोगटातील सिद्धयोग्यांकडून आणि जगाच्या सर्व भागांमधून कविता आल्या आहेत—ऑस्ट्रेलियापासून स्वित्झर्लंडपर्यंत, जपानपासून अमेरिकेपर्यंत; भारत, दक्षिण आफ्रीका, तुर्कस्तान, ब्राझील, इटली, जर्मनी आणि फ्रान्स या देशांमधून. यादी खूप मोठी आहे. इतकेच नव्हे तर, तुमच्यापैकी काही लोकांनी एकापेक्षा जास्त कविता पाठवल्या आहेत. खरेतर, तुमच्या *शंभराहून अधिक* कविता सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर प्रकाशित झाल्या आहेत. एक लेखिका म्हणून मला हे माहीत आहे की, रचनात्मकतेचा प्रवाह एकदा सुरू झाला की, त्याला विरामच नसतो—त्यामुळे मी आत्मविश्वासाने हे म्हणू शकते की, वर्ष २०२३मध्ये प्रवेश करताना तुम्हाला तुमच्या साधनेतील अनुभव अभिव्यक्त करण्याचे आणखीही नवीन आणि प्रेरणादायी मार्ग मिळत राहतील.

आज तुम्हाला हे पत्र लिहिण्याचे मुख्य कारण आहे की, तुम्ही जे दिले आहे त्यासाठी तुम्हाला हृदयपूर्वक धन्यवाद देणे—तुमचे प्रेम, तुमची भक्ती, सिद्धयोग मार्गाप्रति असलेली तुमची वचनबद्धता, सिद्धयोग साधनेप्रति असलेले तुमचे समर्पण, तुम्ही जे ज्ञानार्जन केले त्याचे फळ आणि तुम्हाला जे प्राप्त झाले त्याचा प्रसाद, या सगळ्यासाठी तुम्हाला धन्यवाद. वर्ष २०२२साठी श्रीगुरुमाईंच्या सीझन्स् ग्रीटिंग्स्विषयी तुम्ही लिहिलेल्या कवितांमध्ये हे सर्वकाही स्पष्टपणे झळकत होते.

आणि जे काही मी तुमच्यापैकी काही लोकांकडून ऐकले, ते पाहता हे सर्व आणखीनच हृदयस्पर्शी झाले—की तुम्हाला हा प्रयास अतिशय नवीन वाटला; की कदाचित तुम्ही यापूर्वी कधीही स्वतःला कवी अथवा लेखक मानले नव्हते. मी हेदेखील मान्य करू इच्छिते की, एखादी कविता किती वैयक्तिक असू शकते—कशा प्रकारे तिची लय, तिच्यामागे असलेली तर्कसंगतता, तिचे सौंदर्य, तिचा अर्थ असा प्रतीत होऊ शकतो की, जणू तो तुमच्या स्वतःचाच प्रसार, तुमच्या स्वतःचेच विस्तृत रूप असावे. इतरांना तुमची कविता ऐकवताना तुम्ही स्वतःचाच एक अंश त्यांना देत होतात, म्हणजे असे काहीतरी देत होतात जे अतिशय खास आणि दिव्य आहे, जी तुमच्या अंतःस्थ जगताची एक झलक आहे.

आणि इथे तुम्ही खरोखरच निर्भीडपणे, उत्साहाने, अंतःप्रेरणेने आणि कौशल्याने हे करून दाखवले. ज्याप्रमाणे गोपी भगवान श्रीकृष्णाच्या बासरीला प्रतिसाद देत, त्याचप्रमाणे तुम्हीदेखील श्रीगुरूंचे शब्द ऐकून त्यांचे पालन करण्यास तत्पर झालात. वर्ष २०२२साठी दिलेल्या नववर्ष संदेशामध्ये श्रीगुरुमाई म्हणतात, "ऐका. . .," आणि तुम्ही अगदी तेच केले. तुम्ही ऐकले.

याच्या फलस्वरूप, गेल्या काही आठवड्यांमध्ये ज्या कोणी सिद्धयोग मार्गाची वेबसाइट पाहिली तो तुमच्या विपुल औदार्याने लाभान्वित झाला. माझ्या सिद्धयोगी मित्रांनी मला सांगितले की, तुमच्या कवितांमुळे त्यांना किती प्रेरणा मिळाली आणि इतरांना कविता लिहिताना पाहून *त्यांना* देखील अशी प्रेरणा मिळाली, की त्यांनीदेखील सीझन्स् ग्रीटिंग्स्वर आपली एक कविता लिहून पाहावी.

आणि किमान मी तरी असे अनुभवले आहे की, तुमच्या कविता वाचून मी सीझन्स् ग्रीटिंग्स्च्या त्या गोष्टींकडे अधिक लक्ष देऊ शकले, ज्यांकडे मी आधी लक्ष दिले नव्हते आणि—मी विचारही केला नव्हता की, असेदेखील घडू शकते—त्यामुळे मला सीझन्स् ग्रीटिंग्स्विषयी आणखीनच आदर व कृतज्ञताभाव जाणवतो आहे. मी जेव्हा कविता लिहिण्यासाठी तुम्हाला पहिल्यांदा आमंत्रित केले होते, तेव्हा मला याची कल्पनादेखील नव्हती की, तुम्ही, माझे सह-सिद्धयोगी, तुमच्या मनमोकळेपणाने व प्रतिभेने मला पूर्णतः आश्चर्यचकित कराल. हे सर्व मला पुन्हा एकदा स्मरण करवून देते आहे की, सिद्धयोग मार्गावर मी किती भाग्यशाली जीवन जगते आहे—आपण सगळेच अत्यंत भाग्यशाली जीवन जगतो आहोत.

श्रीगुरुमाई, तुम्हाला खूपखूप धन्यवाद. आणि तुम्हा सर्वांनाही धन्यवाद.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

©२०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.